प्रकरण तिसरे :-

*"इचलकरंजीतील दलितांची

सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती."

## -: प्र क र ण ति स रे :-

भारतात प्राचिन काळापासून हिंदू धर्माचे प्राबल्य राहिले आहे. हिंदू धर्मातील कांही बुध्दीमान परंतु स्वार्थीआणि अहंकारी लोकांनी सर्व हिंदू समाज आपल्या काबूत ठेवण्यासाठी मूळ आर्थिक मूल्ये बाजूस सारुन स्वत:च्या हित पोषणासाठी नवीन मूल्ये-संहिता निर्माण केली तिलाच "हिंदूंची चातुर्वर्ण्य पद्दती"म्हणतात. या चातुर्वर्ण्यामुळे हिंदू समाजाचे चार भिन्न तुकडे झाले. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र अशी त्या तुकड्यांना नावे दिली. चौथा वर्ण जो शुद्र त्यातही अतिशुद्र असा उपभेद निर्माण करुन ठेवला.

चातुर्वर्ण्यानुसार ब्राम्हणांनीच शिक्षण घ्यावे आणि धार्मिक कृत्ये करावीत, क्षत्रियांनी ब्राम्हणांच्या सहाय्याने शासनसंस्था चालवावी व समाजाचे, देशाचे परकियांच्या आक्रमणापासून रक्षण करावे, वैश्यांनी व्यापार-उदीम करावा, शुद्रांनी शेती करुन वरील तीन वर्णांची सेवा करावी, आणि अति शुद्रांनी वरील सर्वांची सेवा करावी आणि त्यांच्या आज्ञेतच रहावे. असा दंडक घालण्यात आला. याविरुध्द जर अतिशुद्रांनी वरील वर्णांच्या कार्यात जर हस्तक्षेप केला अगर कोणत्याही प्रकारची दखल घेतली तर त्यांना चातुर्वर्ण्य पुरस्कृत मनुस्मृतीने कठोर शिक्षा मुक्रर करुन ठेवल्या आहेत. त्या शिक्षांमुळे अतिशुद्रांच्या जीवनविषयक गरजासुध्दा परावलंबी व तुटपुंज्या राखल्या आहेत. अन्न, वस्त्र व निवारा या महत्वाच्या गरजा आहेत. पण कुठल्याच उत्पन्नाचा मार्ग त्यांना उपलब्ध नसल्यामुळे सतत परक्यांच्या अपेक्षेवरच अन्न-वस्त्रांची गरज भागवावी लागत होती. अतिशुद्रांनी-अस्पृश्यांनी उच्चवर्णियांच्या मृताचे कपडे वापरावेत, त्यांची नित्य वापरावी भांडी केवळ मातीचीच असावीत, स्पृश्यासारखी सुखसोईंनी युक्त मोठी घरे बांधू नयेत, जर तशी घरे बांधली तर ती नष्ट करुन टाकावित, शुद्रांनी व्यापार उदीम सुरु केला तर त्यांच्याशी कोणीही व कसलाही आर्थिक

व्यवहार करू नये, शूद्रांच्या शेतातील उभ्या पिकात स्पृश्य वर्णियांची गुरे शिरली तरी त्याने ती गुरे बाहेर हाकलून काढू नयेत, असे विविध निर्बंध घातले होते. शिक्षण आणि धर्मपठणाबाबत तर फारच कडक निर्बंध घातले होते. जबर शिक्षा ठरवून दिल्या होत्या. कोणी शूद्र-अस्पृश्य धर्म श्रवण करू लागला, वेद ऐकू लागला तर त्याच्या कानात शिशाचा तप्त रस ओतावा, कोणी शूद्र धार्मिक मंत्रांचा किंवा वेदांचा उच्चार करू लागला तर त्याची जीभ छाटून टाकावी, जर कोणी शूद्र वेद वाचू लागला तर त्याच्या डोळ्यात लोखंडाच्या सळया तापवून लाल करून खुपसाव्यात व त्याचे डोळे फोडून टाकावेत, शूद्राशी कोणी उच्चवर्णियांनी संपर्क ठेवू नये, रोटी-बेटी व्यवहार करू नयेत, शूद्र स्त्रीशी संबंध ठेवू नये, जर कोणी तसा संबंध ठेवलाच व तिला जर संतती झाली तर ती संतती अकरमाशी समजावी, शूद्राने उच्चवर्णिय स्त्रीशी संबंध ठेवला तर त्यास देहदंडाची शिक्षा द्यावी. अशा कितीतरी कठोर व अमानुष शिक्षांची तरतूद करून ठेवली आणि प्रसंगी त्यांची अंमलबजावणीही बिनदिक्कतपणे केली गेली.

या सर्व बंधनांमुळे शूद्रांची-अस्पृश्यांची सर्वतोपरी पिछेहाट झाली. मनुष्य जन्म असूनसुध्दा पशूतुल्य जीवन जगावे लागणारा हा समाज सर्व बाजूंनी अवनतीच्या खाईत लोटला गेला. ज्या शूद्रांना-अस्पृश्यांना आपल्या या अधोगतीची व दैन्यावस्थेची जाणीव झाली, त्याविषयी चीड येऊन या अन्यायाविरूध्द ज्याने बंड करून उभे राहण्याचा प्रयत्न केला तर त्याला शेवटी आपल्या प्राणांचे मोल द्यावे लागत होते. जीवनास मुकावे लागत होते.

राजेशाहीमध्ये चार वर्णांची समाजव्यवस्था अस्तित्वात होती. त्याचेच रूपांतर सरंजामशाहीमध्ये बलुतेदारी व्यवस्थेमध्ये झालेले दिसते. प्रत्येक गांवामध्ये बलुतेदार व अलुतेदार[२] अस्तित्वात होते असे दिसून येते. हे दोन्हीही वर्ग त्या,त्या गांवचे मूळचे रहिवाशी होते. गांवातील - शेतक-यांच्या विविध गरजा ते भागवत असत. ही पद्धती संपूर्ण भारतभर प्रचलित होती. परंतु तिचे स्वरूप वेगवेगळ्या ठिकाणी भिन्न असलेले दिसून येते. त्यामुळे या पद्धतीला भारतभर वेगवेगळया नांवाने ओळखले जाते. महाराष्ट्रात ती "बारा बलुतेदारीची पद्धती" म्हणून परिचित आहे.२

महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात असलेल्या या पद्धतीमध्ये शेतक-यास आवश्यक असणा-या वस्तू व सेवा यांच्या महत्त्वाप्रमाणे बलुतेदारांमध्ये क्रमवारी लावण्यात येते. ही क्रमवारी तीन ओळींची असते. प्रथम ओळीत अत्यावश्यक सेवा करण्याचा समावेश होतो. उदा.महार, चांभार हे प्रथम ओळीत मोडतात. तर मांग दुस-या ओळीत असतात. बलुतेदार गांवाच्या दैनंदिन कामाबरोबरच सरकारचे व लोकसेवेचेही कार्य करीत होते. अलुते-दारापेक्षा बलुतेदारांना महत्त्व असे. कारण त्यांची कामे निकडीची असत.

बलुतेदार पद्धतीत उपयुक्त वस्तू व सेवा पुरविणा-या जातींचा समावेश होत होता. ढोर, चांभार, म्हार, होलार व मांग चामडयाच्या मुख्य धंद्यातील वेगवेगळी कामे पार पाडत. ज्या ढोरांनी जोडे करण्याचे काम पत्करले ते चांभार झाले आणि ज्या चांभारांनी महारमांगाचे सुध्दा जोडे करण्याचे पत्करले ते होलार झाले.[३] ज्या जाती शेतकरी व शेती यासाठी आवश्यक असणा-या वस्तू तयार करत होत्या, त्यांचा समावेश बलुतेदारांमध्ये केलेला दिसतो. महाराष्ट्रातील बारा बलुतेदारात चौगुला,

महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, जोशी, परीट, गुरव, कोळी, सोनार यांचा समावेश केला जात असे.

बलुतेदारांमधील दलित समजल्या जाणा-या महार, मांग, चांभार, व ढोर या जातीच्या कार्याची माहिती घेणे महत्वाचे ठरते. महार या जातीची कामे सरकारोपयोगी, ग्रामोपयोगी व रयतोपयोगी असत. जे महार गांवकीची कामे करीत त्यास महार म्हणत व जे महार चौकी पहारा करणे किंवा गांवचा पोलीसशिपाई म्हणून चोरांचा तपास लावणे, माग काढणे अशी फौजदारी कामे करीत त्यास "जागले" म्हणत. महार हा रोख पगाराशिवाय काम करणारा वेठबिगार होता. महारांनी ओझे - पोचवायचे. "पडे" न्यायचे.

मुलकी आणि फौजदारी स्वरूपाच्या कामामध्ये गांवचा वसूल - तहसिलात जमा करणे, कागदपत्रे परगांवी पोहोचविणे, गांवात मुक्कामाला अधिकारी आले की त्यांची व्यवस्था करणे, दवंडी देणे, मयताचा सांगावा देणे इ. कामे समाविष्ट होती.

मांग जातीच्या कामामध्ये केरसुण्या, शिंकी, कासरे, नाडे, जुंपण्या वेल्हे इ. वस्तू तयार करून गांवाला पुरविणे व डफ वाजविणे, मरी आईची पूजा करणे, फाशी देणे इ. कामे करीत असत.

चांभाराचे काम म्हणजे मोट शिवणे, तिला ठिगळ लावणे, गोफणीला टवळे लावणे, जुना जोडा, आसूड सांधणे इ.कामे करावी लागत. त्याबद्दल सुगीमध्ये बलुतं मिळे. पण नवीन जोडा, आसूड, मोट याबद्दल रोख पैसे घेत असत.

ढोराचे काम म्हणजे जनावरांचे कातडे कमावणे, जनावरांचे कातडे

आणून त्याच्यावर वेगवेगळ्या प्रक्रिया करणे व वप्पल बनवण्यास योग्य असे स्वरूप त्याला देणे हे प्रामुख्याने ढोरांचे काम असे.

महारांच्या कामाच्या मोबदल्यात त्यांना वतन किंवा वेतन मिळत असे. सुतार, लोहार, चांभार, कुंभार यांनाही सुतारकी, चांभारकी, कुंभारकी अशा जमिनी मिळत. या शिवाय धान्य स्पाने मोबदला मिळत असे.

उपरोक्त अस्पृश्य बलुतेदारांजवळ उत्पादनाचे प्रमुख साधन म्हणजे "जमिन" ही विपुल प्रमाणात नव्हती. तसेच कौशल्य नसल्यामुळे वेठ-बिगारीची कामे करावी लागत असत. साहजिकच कुटुंबाचा व्याप वाढत जाईल तसे वर्षभर पुरेल अशा जीवनावश्यक वस्तू गोळा करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करावा लागत असे. अशाप्रकारे धार्मिकदृष्टया निकृष्ट दर्जाच्या अस्पृश्य समजलेल्या जाती आर्थिकदृष्टयाही दुर्बल ठरल्या.

महार, मांग जातीचे लोक मेलेली ढोरे, गाई, म्हशी फाडतात व खातात म्हणून महारवाडा व मांगवाडा गांवापासून दूर असे. अस्वच्छ कामामुळे त्यांना अस्पृश्य ठरविले गेले. अस्पृश्य जातींपैकी ज्या गोमांस खात नाहीत अशा ढोर, चांभार इ.ची घरे गांवाला खेटून असतात.

या लोकांना सोन्या-चांदीचे दागिने घालणे, घोडयावरून वरात काढून गांवच्या वेशीत येणे, यास बंदी होती. त्यांना गो दोहन, यज्ञ, अग्नि प्रज्वलित करणे, संपत्ती संचय करणे अमान्य होते. दुभत्या जनावरा-ऐवजी कुत्री, गाढवे पाळण्याची परवानगी होती. व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नसल्यामुळे या अस्पृश्य बलुतेदारांवर पारंपारिक समाजाच्या व

कमी वेतनाच्या ग्रामसेवांची सवती असे.

या पद्धतीमध्ये अनेक दोष होते. कारण बलुतेदारी वैयक्तिक संबंधावर आधारित होती. बलुतेदारी पद्धती कृषिप्रधान जुन्या ग्रामव्यवस्थेतच उपयोगी ठरत होती. परंतु उत्पन्नाची कोणतीही साधने स्वत:च्या मालकीची नसणा-या दलितांना सामाजिकदृष्टया हीन ठरवित होती. त्यामध्ये आर्थिक परावलंबित्व असल्यामुळे शोषण असे. गुलामगिरीला त्यामुळे प्रोत्साहन मिळे. श्रमांची योग्य किंमत श्रमिकांना मिळत नसे. सत्तेचे व संपत्तीचे केंद्रिकरण होऊन दलितांवर अन्याय व जुलूम होत होते. वस्तूच्या स्वरुपात मोबदला दिला जाई. तो मजूरीच्या दराप्रमाणे वाढू शकत नव्हता. जाती पद्धतीमुळे समाज विभागला गेला होता. त्यामुळे ह्या पद्धतीमध्ये परिवर्तन होत गेले.

ही पद्धती हळूहळू नष्ट होत आहे त्याची कारणे म्हणजे शिक्षणाचा प्रसार होत आहे, खेडयांचा संपर्क शहरांशी येत आहे, सामाजिक, राजकीय जागृती, आंदोलने होत आहेत. यामुळे आर्थिक व सांस्कृतिक गुलामगिरी-विरुध्द त्यांच्या मनात तिरस्कार व चीड वाढली. अन्याय व अत्याचारा-विरुध्द ते लढू लागले. नवीन पिढीचा ओढा पारंपारिक व्यवसाय सोडून देण्याकडे आहे.

समाजसुधारकांनी व राजकीय विचारवंतांनी सामाजिक समता, राजकीय जागृती इ. क्षेत्रात कार्य केले. त्यामुळे या समाजात नवीन विचारांचे वारे वाहू लागले. बलुतेदारीचे जीवन संपुष्टात आले. त्यामुळे भूमीहीन, शेतमजूर व बिगार यांची संख्या वाढू लागली. या समस्येवर एक उपाय म्हणजे शिक्षण हा आहे. तसेच त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणे गरजेचे

.. 8853
A

ठरते. स्वतंत्र भारतामध्ये लोकशाही, समाजवाद व कल्याणकारी राज्याच्या प्रस्थापनेसाठी नियोजनाचा मार्ग स्वीकारला आहे. त्यामुळे विविध शासकीय योजना कार्यान्वित करुन बलुतेदार पद्धतीतील दलितांचे आर्थिक प्रश्न सुटू शकतील.

हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेने व जाती पद्धतीमुळे व्यक्ति-व्यक्तितील विषमता जतन केली. ती नष्ट होण्यासाठी भारत स्वतंत्र झाल्यावर भारतीय राज्यघटनेत कलम १५, १७, २९, ४६, ३३०-३३२, ३३५, ३३८ व ३४० यानुसार समानता, व्यवसाय संधी, अस्पृश्यता निवारण इ. तरतुदी - करण्यात आल्या. त्यामुळे समानतेला राजकीय मान्यता दिली गेली. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने दलितांच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या. अनेक महामंडळांची निर्मिती केली.

महाराष्ट्रातल्या बलुतेदार पद्धतीतील दलितांच्या आर्थिक विकासाचा प्रश्न म्हणजे महाराष्ट्रातल्या अस्पृश्यांचा प्रश्न होय. कारण अस्पृश्य बलुतेदारांची [महार, मांग, चांभार] संख्या इतरांपेक्षा अधिक होती. बलुतेदारीतील या जातींना भूमीहीन शेतमजूर म्हणून जीवन जगावे लागत असे. कायद्यानुसार कामगारांना जशी त्यांच्या श्रमाची किंमत मिळते तशी भूमीहीन शेतमजूरांना मिळत नव्हती.

महाराष्ट्रात १९६१ च्या जनगणनेनुसार दलितांची लोकसंख्या २२.२७ लाख होती. १९८१ मध्ये ती ४४.७९ लाख होती. कांही जिल्ह्यांचा विचार करता त्यांची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे. -

सोलापूर ३.२० लाख, उस्मानाबाद २.८५ लाख, कोल्हापूर २.३२लाख

मुंबई २.१० लाख, पुणे १.७५ लाख, बीड १.६१ लाख, नांदेड १.२७ लाख अहमदनगर २.११ लाख. या लोकसंख्येपैकी जवळजवळ निम्मी लोकसंख्या महार, मांग, चांभार यांची आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील दलितांची लोकसंख्या २.३२ लाख असलेचे दिसून येते. आमच्या पाहणीवरुन असे दिसून आले की, त्यातील अंदाजे ४० हजार लोकसंख्या इचलकरंजीत राहते. महाराष्ट्रातील इतर गांवामध्ये जी परिस्थिती होती तशीच परिस्थिती इचलकरंजीमध्येही अस्तित्वात होती.

सरंजामशाहीच्या काळामध्ये इचलकरंजीत थोडे लोक जमीनदार होते तर बहुतेक लोक भूमीहीन होते. शेतीला अनुसरुन प्रत्येक गांवात जशा वेगवेगळया जाती निर्माण झाल्या होत्या, तशाच त्या इचलकरंजीमध्येही अस्तित्वांत होत्या. या सर्व जाती समान मानल्या जात नव्हत्या, तर कांही श्रेष्ठ आणि कांही कनिष्ठ मानल्या जात होत्या. कृषि उद्योगाच्या दृष्टीकोनातून इचलकरंजी स्वयंपूर्ण गांव होते. गांवातील लोकांसाठी लागणा-या वस्तूंचे उत्पादन गांवातच होत होते.

गांव स्वयंपूर्ण होण्यात बारा बलुतेदार व तेरा अलुतेदारांचा महत्वाचा सहभाग होता. हे दोन्ही प्रकारचे लोक गांवाची सर्व प्रकारची कामे करुन देत असत. बलुतेदार व अलुतेदार हे गांवचे मूळचे रहिवाशी होते, बारा बलुतेदार इचलकरंजीतील लोकांचे वर्षभर काम करत असत. त्यांना आवश्यक असणा-या वेगवेगळया वस्तूंचा पुरवठा करीत असत.

दलित बलुतेदारांजवळ स्वतःची जमिन नव्हती. त्यामुळे ते इतरांच्या

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

शेतावर मजुरी करण्यासाठी जात असत. दलितातील जातींना अस्पृश्य समजून बाजूला ठेवले जात होते. इतर लोकांप्रमाणे समारंभ, हौसमौज करण्याची मुभा त्यांना दिलेली नव्हती. बलुत्याचा व्यवसाय सोडून - दुसरा कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. त्यामुळे बलुत्याची कामे त्यांना सक्तीने करावी लागत असत.

बलुतेदारांमध्येच महार, मांग, चांभार, ढोर या दलित जातींचाही समावेश केला होता. महारांची कामे म्हणजे गांवाची साफसफाई करणे, लाकूड फोडणे, मयताचा निरोप देणे, मांगाचे काम म्हणजे दोर वळणे व वाद्य वाजविणे. चांभाराचे काम म्हणजे नवीन चप्पल तयार करणे, जुने चप्पल दुरुस्त करणे, मोट शिवणे इ.कामांचा समावेश होत होता. ढोराचे काम म्हणजे जनावराचे कातडयांवर विविध रासायनिक प्रक्रिया करून कातडे कमावणे वगैरे कामे करावी लागत असत.[४]

महाराष्ट्रातील बलुतेदारीची पद्धती हळूहळू बदलत चालली आहे. ती नष्ट झाली आहे असे म्हणता येत नाही. कारण कांही खेडेगांवामध्ये अजूनही बलुतेदारीची पद्धती अस्तित्वात आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर कोल्हापूरचे राजर्षि श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानामध्ये अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले होते. त्यामुळे आसपासच्या गांवामध्येदेखील थोडयाफार सुधारणा घडल्या. त्याचबरोबर डॉ.आंबेडकरांनी दलितांची अस्मिता जागृत केली. त्यामुळे दलितांमध्ये नवीन जाणीवा निर्माण झाल्या. आपल्यावर अन्याय होत आहे. त्यास आपण प्रतिकार केला पाहीजे हा नवीन विचार त्यांच्यामध्ये रुजला.

बलुतेदारीची पद्धती झुगारून देण्यात दलित थोड्याफार प्रमाणात यशस्वी झाले. परंतु यानंतर त्यांच्यापुढे उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न होता. त्यासाठी ते शेतमजूर म्हणून काम करू लागले. राज्यघटनेने अस्पृश्यांना अस्पृश्यतेपासून मुक्त केले. त्याचप्रमाणे दलितांना कांही सवलती दिल्या. याचा परिणाम म्हणून दलितांच्यात साक्षरतेचे लोण पसरत गेले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळून आले. सरकारने वेगवेगळ्या योजना हाती घेऊन मागासलेल्या वर्गांना इतर समाजाच्या बरोबरीने आणण्याचा निश्चय केला व राज्यघटनेमध्ये व्यक्त केलेली अपेक्षा थोडी फार पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

वरीलप्रमाणे दलितांमध्ये साक्षरतेचे प्रमाणही वाढले. शिक्षणाचा प्रसारही थोडाबहुत झाला. त्यामुळे या समाजाला इतर व्यवसायात पदार्पण करण्याची संधी मिळू लागली. त्यामुळे दलित आपले पारंपारिक धंदे सोडून नवीन नवीन उद्योगधंद्यामध्ये पदार्पण करीत आहेत. व्यवसायात होणाऱ्या बदलामुळे समाज परिवर्तनालाही गती मिळालेली आहे.

नवीन उद्योगधंद्यात प्रवेश करण्याचे महत्वाचे कारण म्हणजे परंपरागत व्यवसायामुळे कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागू शकत नाहीत. त्यामुळेही लोक आपल्या जातीचा परंपरागत धंदा सोडून इतर व्यवसाय करत आहेत. लोक-जागृती, शिक्षण व तांत्रिक ज्ञानाच्या कक्षा वाढत गेल्यामुळेही हे परिवर्तन घडले. त्याचप्रमाणे औद्योगिकरण व शहरीकरण वाढल्यामुळे उद्योगधंद्यांची-देखील झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे दलितांना नवीन उद्योगधंद्यात प्रवेश करण्याची संधी मिळाली.

इचलकरंजीमध्येही तीस-पस्तीस वर्षापूर्वी दलितांनी यंत्रमाग उद्योगात प्रवेश केला. त्यावेळी हातमागही थोड्या प्रमाणात अस्तित्वात होते. हातमागावर सुती साड्या विणल्या जात असत. त्या साड्यांसाठी रहाटावर कांड्या भराव्या लागत. रहाटावर कांड्या भरणारा कामगार म्हणून दलितांनी या उद्योगात प्रवेश केला. त्यांचा प्रवेश हातमागाशी संबंधित व्यवसायात जरी झाला असला तरी नंतरच्या काळात त्यांनी यंत्रमागाची माहिती घेऊन यंत्रमागावर कामगार म्हणून कांही काळ काम केले. त्यानंतर आर्थिक सहाय्य घेऊन यंत्रमागधारक झालेले दिसून येतात. हे आर्थिक सहाय्य पेढीवाल्यांकडून किंवा खाजगी स्वरूपात सावकारी करणा-या व्यक्तिंकडून घेतले होते. त्यातून त्यांनी यंत्रमागाची एक जोडी खरेदी केली होती. ती त्यांची यंत्रमागधारक म्हणून सुरूवात होय. त्यानंतर दोनाचे चार, चाराचे आठअसे माग वाढत गेले. आणि सुरूवातीला "कामगार" असलेले दलित "यंत्रमागधारक" झाले.

--=0=--

-x संदर्भ x-


१. अत्रे त्र्यंबक नारायण, – "गावगाडा", ह.वि.मोटे प्रकाशन १९५९ – पृष्ठ क्रमांक ९.

२. उपरोक्त

३. उपरोक्त – पृष्ठ क्रमांक ६२ व ७०

४. कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९६१, महाराष्ट्र सरकार, मुंबई.


--=0=--